ePaper


## इराणचा तेल टँकर लपून-छपून जात होता, 20 लाख बॅरल तेल जप्त




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 23 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 9 वरुन...

पीसीएमसीतील ५२ कोटींचा बोगस उपसूचना घोटाळा उघड

### उच्च न्यायालयाचा निर्णय, दोन दशकानंतरही खरे गुन्हेगार मोकाट?

# मालेगाव बॉम्बस्फोटातील सर्व आरोपी निर्दोष



**महाईन्यूज । मालेगाव**

**सुमारे दोन दशकांपासून देशभरात चर्चेत असलेल्या २००६ मधील मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाला अखेर पूर्णविराम लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणातील शेवटच्या चार आरोपींवरील दोषारोप उच्च न्यायालयाने बुधवारी रद्द करत त्यांची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे या भीषण स्फोटप्रकरणात आता एकही आरोपी उरलेला नाही. परिणामी, ३१ निष्पाप नागरिकांचा बळी घेणाऱ्या या घटनेमागील खरे सूत्रधार कोण, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच राहिला आहे.**

८ सप्टेंबर २००६ रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे नमाजानंतर दुपारी झालेल्या चार स्फोटांत ३१ जणांचा मृत्यू झाला, तर ३१२ जण जखमी झाले होते. हमीदिया मशीद, बडा कब्रस्तान परिसर, पार्किंगमधील सायकल, वीजपुरवठा कक्ष आणि मुशावरत चौक अशा गर्दीच्या ठिकाणी स्फोट घडवण्यात आले होते. या घटनेनंतर सुरुवातीला स्थानिक पोलिसांनी तपास केला, मात्र नंतर तो महाराष्ट्र दहशवाद विरोधी पथकाकडे (एटीएस) सोपवण्यात आला.

एटीएसने सुरुवातीला ‘स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया’ (सिमी) या बंदी घातलेल्या संघटनेशी संबंधित नऊ मुस्लीम व्यक्तींना अटक केली होती. त्यांच्यावर कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र, पुढील तपासात त्यांच्या विरोधातील पुरावे कमकुवत ठरले. कबुलीजबाब जबरदस्तीने घेतल्याचेही न्यायालयाने नमूद केले आणि २०१६ मध्ये सर्वांना निर्दोष मुक्त करण्यात आले.

यानंतर तपास केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि पुढे राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) यांच्याकडे गेला. एनआयएने तपासाची दिशा बदलत हिंदू आरोपींना या प्रकरणात आरोपी केले. २०१३ मध्ये दाखल केलेल्या आरोपपत्रात मनोहर नरवारिया, राजेंद्र चौधरी, धनसिंग आणि लोकेश शर्मा यांच्यासह इतर काही जणांची नावे नमूद करण्यात आली होती. त्यांच्यावर इंदूरहून मालेगावपर्यंत स्फोटक नेऊन बॉम्बस्फोट घडविल्याचा आरोप ठेवण्यात आला. मात्र, दीर्घ सुनावणीनंतरही ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आल्याने या प्रकरणाची दिशा पुन्हा बदलली. साक्षीदारांनी आरोपींची ओळख पटवण्यात अपयश, घटनास्थळी थेट पुराव्यांचा अभाव आणि तपासातील त्रुटी यामुळे न्यायालयाने संशयाचा फायदा देत आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यापूर्वीही इतर आरोपींना विविध टप्प्यांवर दिलासा मिळाला होता.

या संपूर्ण प्रकरणात एटीएस, सीबीआय आणि एनआयए अशा तीन प्रमुख तपास यंत्रणांनी स्वतंत्रपणे तपास केला; मात्र कोणत्याही यंत्रणेला ठोस निष्कर्षापर्यंत पोहोचता आले नाही. त्यामुळे तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, या निर्णयानंतर मृतांच्या नातेवाईकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दोन दशकांनंतरही न्याय मिळाला नसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवूनही सत्य समोर आले नाही, अशी खंत व्यक्त होत आहे.

एकूणच, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण हे भारतीय न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणांसाठी एक गंभीर उदाहरण ठरले आहे. अनेक वर्षांच्या तपासानंतरही सत्य उलगडण्यात अपयश आल्याने भविष्यात अशा प्रकरणांमध्ये अधिक काटेकोर आणि पारदर्शक तपासाची गरज अधोरेखित झाली आहे.

### पीडितांच्या न्यायाची प्रतीक्षा कायम

मालेगाव बॉम्बस्फोटात निष्पाप नागरिकांचे प्राण गेले, मात्र न्याय मिळवण्याचा प्रवास अजूनही अपूर्णच राहिला आहे. तपासाच्या विविध टप्प्यांमध्ये आरोपी बदलत गेले, पण कोणावरही ठोस गुन्हा सिद्ध झाला नाही. दोन दशकांच्या कालावधीत न्यायालयीन प्रक्रियेत अनेक वळणे आली, तरीही अंतिम निष्कर्ष शून्यच ठरला. त्यामुळे मृतांच्या कुटुंबीयांमध्ये नाराजी आणि असंतोष वाढला असून, “दोषी कोण?” हा मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

### २० वर्षांचा तपास, तरीही सत्य गूढच

२००६ च्या मालेगाव बॉम्बस्फोटात ३१ जणांचा मृत्यू होऊनही दोन दशकांच्या तपासानंतर एकही आरोपी दोषी ठरू शकला नाही, ही अत्यंत गंभीर बाब ठरली आहे. स्थानिक पोलीस, एटीएस, सीबीआय आणि एनआयए अशा तीन प्रमुख तपास यंत्रणांनी स्वतंत्रपणे तपास करूनही ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आले. तपासातील बदलती दिशा, जबरदस्तीचे कबुलीजबाब, साक्षीदारांची अपुरी ओळख आणि घटनास्थळी थेट पुराव्यांचा अभाव यामुळे सर्व आरोपी निर्दोष मुक्त झाले. परिणामी, या भीषण स्फोटामागील खरे सूत्रधार कोण, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित राहिला असून, पीडितांना न्याय मिळालाच नाही, अशी भावना बळावली आहे.

# पुण्यातील लटकत्या तारांसाठी 'हैदराबाद पॅटर्न'!

## एसओपी, सर्वेक्षण आणि 'वन विंडो' प्रक्रिया; पालखी मार्गाला प्राधान्य

**महाईन्यूज । लोणावळा**

**शहराच्या विविध रस्त्यांवर आणि चौकांमध्ये लटकणाऱ्या तारांमुळे (ओव्हरहेड केबल) शहराच्या सौंदर्याला बाधा येत आहे. तसेच, या अपघातांचा धोकाही वाढला आहे. याबाबत येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन महापालिका प्रशासनाकडून लटकणाऱ्या तारांबाबत एक सर्वसमावेशक 'मानक कार्यपद्धती' (एसओपी) तयार केली जात आहे.**



शहरातील लटकणाऱ्या तारांचे नियोजन करण्यासाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक महापालिकेत झाली. या बैठकीला विद्युत विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा शेकटकर, पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर यांसह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शहरातील विविध भागांमध्ये बेकायदा पद्धतीने टाकण्यात आलेल्या ओव्हरहेड केबलच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातून पंढरपूरला जाणाऱ्या आषाढी वारीचे नियोजन करण्यासाठी पालखी मार्ग केबलमुक्त करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या. पालखी मार्गावरील केबल्स महापालिका प्रशासनाने प्राधान्याने हटविण्याचे आदेश या बैठकीत देण्यात आले.

केबल सेवा पुरवठादारांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया करावी. सेवा पुरवठादारांचा त्रास कमी करण्यासाठी तसेच महापालिकेकडे आलेले अर्ज मंजुरीसाठी 'एक खिडकी योजना' राबविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. यामुळे यामध्ये पारदर्शकता येणार आहे. शहरातील सर्व भागातील केबलचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल तातडीने प्रशासनाकडे देण्याच्या सूचना पथ विभागाला देण्यात आल्या.

केबलबाबत निर्णय घेण्यासाठी तसेच राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये समन्वय राहण्यासाठी पोलीस, वाहतूक पोलीस, महावितरण, एमएनजीएल या सारख्या विभागांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे म्हणाले, शहरातील नागरी सुविधांमध्ये अडथळा होऊ नये, यासाठी केबलचे व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून अभ्यास केला जात आहे. अंतिम 'एसओपी'चा मसुदा तयार केला जात असून, तो लवकरच महापालिका आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविला जाईल.

### हैदराबाद पॅटर्नचा अवलंब

पुणे शहरात सध्या विनापरवाना विस्तारलेल्या केबल जाळ्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी आता हैदराबाद शहराच्या धर्तीवर नियमावली तयार करण्यात येणार आहे. यामध्ये ओव्हरहेड केबल्ससाठी उंचीची मर्यादा निश्चित करणे, स्वतंत्र पोल उभारण्यासाठी भाडे दर ठरविणे तसेच रोड क्रॉसिंगच्या ठिकाणी 'अंडरग्राउंड डक्ट'चा वापर अनिवार्य करणे, अशा प्रमुख तरतुदींचा समावेश असणार आहे.

# पुण्यात परीक्षा गोपनीयतेला धक्का; पॅट-३ पेपर सोशल मीडियावर व्हायरल

**महाईन्यूज । पुणे**

**शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या नियतकालिक मूल्यांकन चाचणी (पॅट ३) परीक्षेची प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात यूट्यूबवरील सहा चॅनेलविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या डॉ. मनीषा ताठे यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता, गणित, इंग्रजी, मराठी विषयातील कल जाणून घेण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून पॅट ३ ही परीक्षा घेण्यात येते. ११ एप्रिल रोजी मराठी भाषेचा संकलित चाचणी प्रश्नपत्रिका क्रमांक एक, १५ एप्रिल रोजी गणित विषय संकलित चाचणी प्रश्नपत्रिका २, २२ एप्रिल रोजी इंग्रजी विषय प्रश्नपत्रिका ३ या विषयांची परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. प्रश्नपत्रिका महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेकडून तयार करण्यात येते.

पुण्यातील एका खासगी मुद्रणालयातून प्रश्नपत्रिकांची छपाई केली जाते. प्रश्नपत्रिका छापल्यानंतर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वितरण करण्यात येते. ही प्रक्रिया गोपनीय असते. मात्र, परीक्षा होण्यापूर्वीच सहा चॅनेलवर मराठी, इंग्रजी, गणित या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर डॉ. ताठे यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

यप्रकरणी महाराष्ट्र विद्यापीठ मंडळाच्या, तसेच अन्य परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ५, ६ अन्वये आणि माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून सोशल मीडियावर प्रश्नपत्रिका प्रसिद्ध कशी करण्यात आली, याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरुण घोडके पुढील तपास करीत आहेत.

# नात्याला काळिमा! काकाकडून अल्पवयीन पुतणीचा विनयभंग

**महाईन्यूज । पुणे**



काकाने पुतणीचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी फरासखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, काकाला पोलिसांनी सोलापूर परिसरातून अटक केली.

याबाबत एका अल्पवयीन युवतीने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, काकाविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो), तसेच विनयभंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित युवती कुटुंबीयांसह राहते. ती एका महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. आरोपी काका दोन वर्षांपूर्वी युवतीच्या घरी राहत होता. त्यानंतर तो सोलापूरला मूळगावी कुर्डुवाडी येथे गेला होता. १० एप्रिल रोजी सकाळी अकराच्या सुमारास युवती महाविद्यालयातून घरी निघाली होती. त्या वेळी काकाने तिचा पाठलाग केला. तिला रस्त्यात अडवून विनयभंग केला. या घटनेनंतर युवती घाबरली. तिने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी पसार झालेल्या कुर्डुवाडीतून अटक केली. अटक करण्यात आलेल्या काकाला दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.

# ‘एसटीपी’शेजारी ‘बायपास’चा खेळ; सांडपाणी थेट इंद्रायणी-पवना नद्यांमध्ये

## यंत्रणा बंद, क्षमतेचा बहाणा; इंद्रायणी सर्वाधिक प्रदूषित, ठेकेदार-प्रशासनावर आरोप

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारून नदी प्रदूषण रोखण्याचा दावा केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात एसटीपीच्या शेजारूनच ‘बायपास लाइन’द्वारे न शुद्ध केलेले सांडपाणी थेट इंद्रायणी आणि पवना नद्यांमध्ये सोडले जात असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले प्रकल्प केवळ कागदोपत्रीच कार्यरत असल्याची टीका होत आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी उभारलेले एसटीपी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नसल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. काही ठिकाणी यंत्रणा बंद, तर काही ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक सांडपाणी येत असल्याचे कारण पुढे करून थेट बायपासमार्गे नदीत विसर्ग केला जातो. जलवाहिनी आणि व्हॉल्व्हची रचना पाहता जाणीवपूर्वक बायपासची व्यवस्था केल्याचे दिसून येत आहे.

**इंद्रायणीच जास्त प्रदूषित...**

इंद्रायणी नदीची प्रदूषणस्थिती पवना नदीपेक्षा अधिक गंभीर असल्याचे विविध निरीक्षणांतून समोर येत आहे. शहरातील सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जाणे, एसटीपी प्रकल्पांची अपुरी क्षमता आणि ‘बायपास लाइन’चा सर्रास वापर यामुळे इंद्रायणीचे पाणी काळपट, फेसाळ आणि दुर्गंधीयुक्त बनले आहे. महत्त्वाचे म्हणजे, सांडपाणी विसर्गाचे काम, त्यांच्या करारातील अटी काय आहेत आणि नियमभंग झाल्यास कोणती कारवाई होते, याबाबतच्या नियमांना महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हरताळ फासण्याचे काम सुरू आहे.

### नियमांचे सर्रास उल्लंघन

एसटीपीचे ऑपरेशन व मेंटेनन्स सांभाळणाऱ्या ठेकेदारांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन होत असताना महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. उलट, काही अधिकाऱ्यांकडून ‘तांत्रिक अडचणी’चे कारण देत या प्रकाराकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आहे.




## मोमो सेंटरवर खंडणीचा धिंगाणा; चार लाखांची मागणी

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

पिंपळे सौदागर परिसरात दुकानात शिरून चार लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करत दुकानदाराला धमकावले. ही घटना सोमवारी (२० एप्रिल) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कुणाल आयकॉन रस्त्यावर घडली.

या प्रकरणात २० वर्षीय तरुणाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सोपान गजानन बुलाखे (२१, केशव नगर, पिंपळे सौदागर), ओंकार उद्धव बाबर (२०, काटे वस्ती, पिंपळे सौदागर) आणि विवेक विनोद अंबोरे (१८, पिंपळे सौदागर गावठाण; मूळ- केळवदवाडी, चिखली, बुलढाणा) या तिघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी दुचाकीवरून येत फिर्यादीच्या दुकानात प्रवेश केला. चार लाख रुपयांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. एकाने कोयता उगारून तर दुसऱ्याने स्टूलने दुकानातील साहित्याची, लॅपटॉपची आणि ग्राहकांच्या मोटारींच्या काचेची तोडफोड केली. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

# पिंपरी-चिंचवड शहरात २८ एप्रिलला सायंकाळी दुरुस्तीसाठी पाणी बंद

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे मंगळवारी (दि. २८) पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.**



तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी (दि. २९) सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से. क्र. २३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युतविषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

> निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी २८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करून सहकार्य करावे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील राहील.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, महापालिका



## भूमिका

**उष्णतेची तीव्रता, अवकाळी पावसाचे संकट आणि बदलते हवामान या तिहेरी घावांनी राज्यातील शेती अक्षरशः डळमळीत झाली आहे. विदर्भात उष्णतेची लाट, तर कोकण, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात अवेळी पावसाचे तडाखे – या विसंगत परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे.**

# हे नुकसान कसे मोजणार?



एकीकडे पिके उष्णतेने करपतात, तर दुसरीकडे तयार झालेले उत्पादन अवकाळी पावसाने नष्ट होते. परिणामी, शेतकऱ्यांच्या हातात येणारे उत्पन्न आणि वाढता उत्पादन खर्च यामध्ये मोठी तफावत निर्माण होत आहे.

गेल्या काही वर्षांत अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले असून त्याचा थेट परिणाम कांदा, गहू, आंबा, काजू यांसारख्या प्रमुख पिकांवर झाला आहे. हातातोंडाशी आलेले पीक नष्ट झाल्याने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरते. विशेषतः कांद्याच्या बाबतीत, बाजारात पोहोचण्याआधीच माल खराब होण्याची समस्या गंभीर बनली आहे. व्यापारी आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्याला योग्य दर मिळत नाही. अशा वेळी तो घाईघाईने माल विकतो आणि भाव कोसळतात. ही परिस्थिती म्हणजे शेतीतील 'शॉर्ट सेल'च आहे.

सरकारकडून दिली जाणारी मदत ही अपुरी आणि विलंबित असते. पंचनामे, मंजुरी प्रक्रिया आणि विविध कागदपत्रांमुळे मदत मिळेपर्यंत शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडतो. प्रति हेक्टर मिळणारी मदत ही प्रत्यक्ष नुकसानाच्या तुलनेत अत्यल्प आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या अधिकच गंभीर बनतात. विमा योजना असल्या तरी त्या वेळेवर आणि प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे वास्तव आहे.

यंदा एल-निनोचा धोका देखील डोके वर काढत आहे. यामुळे पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता असून खरिप हंगामावर त्याचा परिणाम होऊ शकतो. परिणामी, पेरणी क्षेत्र घटण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अशा परिस्थितीत सिंचनाचे नियोजन, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यांची गरज अधिक अधोरेखित होते. मात्र, ठिबक सिंचनासारख्या उपाययोजनांचे साहित्य महाग झाल्याने शेतकऱ्यांसमोर नवे आर्थिक आव्हान उभे राहिले आहे. हवामान अंदाजांची अचूकता हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. चुकीच्या किंवा अपूर्ण अंदाजांमुळे शेतकरी चुकीचे निर्णय घेतो. सोशल मीडियावर पसरत असलेल्या अप्रमाणित माहितीमुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची बनते. त्यामुळे विश्वासार्ह आणि वैज्ञानिक माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे अत्यावश्यक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, शेतीत टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांना पर्यायी मार्ग स्वीकारावे लागतील. पीक वैविध्यीकरण, शेतीपूरक व्यवसाय, जलसंधारण आणि सामूहिक नियोजन याकडे वळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर, बाजारपेठेतील पारदर्शकता, विमा योजनांची सुधारणा आणि तात्काळ आर्थिक मदत या बाबींची अंमलबजावणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अवकाळी पाऊस आणि बदलते हवामान थांबवणे शक्य नसले, तरी त्यातून होणारे नुकसान कमी करणे निश्चितच शक्य आहे. यासाठी शासन, बाजारव्यवस्था आणि शेतकरी या तिन्ही घटकांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. शेवटी, शेती टिकली तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल, आणि त्यासाठी शाश्वत व सक्षम व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

### भांडण

**भांडणासाठी भांडण आणि टिकेसाठी टीका हा अहंकारी लोकांचा स्वभाव असतो. प्रताप आणि सुमन या जोडप्याला अशीच भांडणाची सवय होती.**

एकदा असेच त्यांचे कडाक्याचे भांडण जुंपले होते. हे पाहून शेजारीच राहणारे वसंतराव ते भांडण सोडविण्यासाठी गेले.

ते म्हणाले, "प्रताप, का भांडता आहात? मी काही मदत करू शकतो का भांडण सोडविण्यास?" या भांडखोर जोडप्यातील पत्नी-सुमन खूपच कजाग होती.

ती तावातावाने वसंतरावांशीच भांडायला उठली. म्हणाली, "का हो? आम्ही का भांडतो ते समजून घेऊन तुम्हाला काय करायचं आहे? आणि आम्ही केव्हापासून भांडतो आहोत, कशासाठी भांडतो आहोत, हे कसं लक्षात राहणार? खूप वेळ झाला भांडण सुरू होऊन. मोठे आलेत विचारायला..."

- तात्पर्य : **हेतू नसलेले कोणतेच कार्य यशस्वी होत नाही. जसे विनाकारण... हेतू नसलेले भांडण!**

लोकसभा सदस्यसंख्या ५४३ वरून ८१६ करण्याच्या प्रस्तावाला नकार मिळणे हे केवळ राजकीय निर्णय नसून आर्थिक वास्तवाची जाणीव करून देणारे पाऊल ठरले आहे.

# विधेयक पडले, पन्नास हजार कोटी रुपये वाचले!



लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवणे आवश्यक असल्याचे तत्त्वतः मान्य असले, तरी त्यामागील प्रचंड आर्थिक बोजा दुर्लक्षित करता येत नाही. प्रत्येक खासदारावर होणारा वार्षिक खर्च, त्यासोबत मिळणाऱ्या सुविधा आणि पायाभूत खर्च लक्षात घेतल्यास हा निर्णय करदात्यांवर मोठा भार टाकणारा ठरला असता. आधीच निवडणुकांवर होणारा प्रचंड खर्च, उमेदवारांच्या अफाट खर्चाच्या पद्धती आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे लोकशाहीची गुणवत्ता प्रश्नांकित होत आहे.

लोकप्रतिनिधींची संख्या वाढवण्याआधी त्यांच्या कामगिरीचे निकष, जबाबदारी आणि उत्तरदायित्व यावर ठोस धोरण आवश्यक आहे. अनेक खासदार सभागृहात अनुपस्थित राहतात, चर्चांमध्ये भाग घेत नाहीत, तर महत्त्वाची विधेयके काही मिनिटांत मंजूर होतात. अशा परिस्थितीत केवळ संख्या वाढवून लोकशाही मजबूत होईल, हा युक्तिवाद कमकुवत ठरतो. उलट, प्रभावी कामगिरीसाठी शिस्त आणि पारदर्शकता अधिक गरजेची आहे. दुसरीकडे, राज्यसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेले 'ऑपरेशन लोटस'चे राजकारण हे सत्तासंघर्षाचे वास्तव दाखवते. आकड्यांचे गणित सोपे असले, तरी प्रत्यक्ष राजकारणात समीकरणे सतत बदलत असतात. पक्षांतर, अपात्रता आणि अंतर्गत गटबाजी यामुळे लोकशाही प्रक्रियेची विश्वासार्हता कमी होते. विरोधी पक्षांनी आपला गट एकत्र ठेवण्याचे आव्हान स्वीकारले नाही, तर सत्ताधाऱ्यांना वरचष्मा मिळणे स्वाभाविक ठरते.

याच दरम्यान, असदुद्दीन ओवेसी यांची वाढती राजकीय उपस्थिती ही देशातील बदलत्या राजकीय समीकरणांची चिन्हे आहेत. पारंपरिक पक्षांपासून वेगळा आवाज निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न काही समाजघटकांना आकर्षित करत आहे. मात्र, त्यांच्या भूमिकेबाबतचे संशय आणि टीका अजूनही कायम आहेत. स्वतंत्र राजकीय पर्याय उभा करण्यासाठी केवळ आक्रमक भाषण नव्हे, तर व्यापक विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.

एकंदरीत, लोकशाही मजबूत करण्यासाठी केवळ प्रतिनिधींची संख्या वाढवणे पुरेसे नाही. त्यासाठी पारदर्शक व्यवस्था, जबाबदार नेतृत्व आणि आर्थिक शिस्त या मूलभूत बाबींवर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा लोकशाहीचा खर्च वाढत राहील, पण गुणवत्ता मात्र घसरत जाईल.

## ।। अभंगवाणी ।।



गरुडाचें वारिकें कासे पीतांबर ।
सांवळें मनोहर कैं देखेन ॥१॥

बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ।
वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बारामतीत मतदानाची तयारी पूर्ण; साहित्य थेट केंद्रांवर

## नवीन पद्धतीनुसार ६० झोनमध्ये वितरण; कर्मचारी व यंत्रसामग्री सुरक्षित पोहोचवली

**महाईन्यूज । बारामती**

**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या (दि. २३) मतदान होणार असून, त्यासाठी आवश्यक मतदान साहित्य व कर्मचारी आज संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम, एमआयडीसी, बारामती येथून ही प्रक्रिया सुरळीत पार पडली.**



या अंतर्गत ४७८ मतदान केंद्रांसाठी ४७८ ईव्हीएम, ९५६ बॅलेट युनिट्स तसेच ४७८ व्हीव्हीपॅट यंत्रे ६० बंदिस्त मिनी टेम्पोद्वारे, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली. यंदा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरण प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे यांनी सांगितले की, यापूर्वीप्रमाणे मतदान पथकांना डिस्पॅच सेंटरवर न बोलावता, थेट त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ईव्हीएम यंत्रांसह लिफाफे, फॉर्म्स आणि इतर आवश्यक साहित्य थेट मतदान केंद्रांवर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

यासाठी संपूर्ण मतदारसंघ ६० झोनमध्ये विभागण्यात आला असून, प्रत्येक झोनसाठी एक क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. एकूण ६० क्षेत्रीय अधिकारी असून, प्रत्येक अधिकाऱ्याकडे सुमारे ८ ते १० मतदान केंद्रांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच, प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र कंटेनरची व्यवस्था करून, त्याद्वारे ईव्हीएम यंत्रांची सुरक्षित वाहतूक केली जात आहे. मतदानासाठी जाणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ज्यांच्याकडे स्वतःचे वाहन नाही, त्यांच्यासाठी ये-जा करण्यासाठी ३० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. उद्या सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. सर्व मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाहीतील आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी केले आहे.

### मतदानासाठी सज्ज बारामती

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आवश्यक सर्व साहित्य व कर्मचारी मतदान केंद्रांवर पोहोचले असून प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. ४७८ केंद्रांसाठी ईव्हीएम, बॅलेट युनिट्स व व्हीव्हीपॅटची सुरक्षित वाहतूक पूर्ण झाली आहे. नव्या पद्धतीनुसार थेट केंद्रांवर साहित्य पोहोचवल्याने प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. उद्या सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार असून, मतदारांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# राज्यात पुढील तीन दिवस वादळाचा प्रभाव; 'या' जिल्ह्यांना बुधवारी 'यलो अलर्ट'

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात सध्या पश्चिमी विक्षोभाची ( वादळाची ) स्थिती असून बहुतांश जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह पावसाची तर काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि गारपीटीची नोंद होत आहे. तर राज्यातील काही भागात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती आहे यामुळे कमाल तापमानात लक्षणीय वाढ नोंदली जात आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील तीन दिवस राज्यातील काही भागात पावसाची शक्यता वर्तविली असून या भागांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.**



राज्यात सध्या काही भागात पाऊस तर काही भागात तीव्र उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आणि एप्रिलच्या सुरवातीच्या दिवसात राज्यातील काही भागात पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर पुन्हा उष्मा वाढला तर सध्या राज्यात पुन्हा पश्चिमी विक्षोभाची स्थिती निर्माण झाली २५ एप्रिल पर्यंत राज्यातील मुख्यतः मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ तर कोकण पट्ट्यातील काही जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तर या दरम्यान काही जिल्ह्यात उष्ण आणि दमट वातावरण राहील, असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात २५ एप्रिलनंतर पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव कमी होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, देशात सध्या अस्थिर हवामान असून काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. हवामान अभ्यासकांच्या मते, देशातील उत्तरेच्या राज्यांमध्ये २५ ते २७ एप्रिल दरम्यान एका नवीन पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव राहील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दरम्यान, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागात पावसाळी हवामान असताना कमाल तापमानात काही ठिकाणी घट नोंदली जात होती. मात्र, सध्या पावसाळी हवामानाचा प्रभाव असताना कमाल तापमानात फारसा बदल दिसून येत नाही. किमान तापमानातही काही भागात सरासरी तापमानाहून वाढ नोंदली जात आहे. बुधवारी दक्षिण गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर कोकणातील काही भागात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

### या भागांना 'यलो अलर्ट'

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग, सांगली, सातारा, सातारा घाट विभाग, पुणे आणि पुणे घाट विभाग, अहिल्यानगर, नाशिक आणि नाशिक घाट विभाग, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धाराशिव, सोलापूर, लातूर, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली आदी भागांना हवामान विभागाकडून बुधवारी 'यलो अलर्ट' देण्यात आला असून या भागात ताशी ३० ते ४० किमी वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# ‘बटर चिकन त्सुनामी’; न्यूझीलंडच्या मंत्र्याचं वादग्रस्त विधान

## भारत आणि न्यूझीलंड यांच्यात असलेल्या मुक्त व्यापार कराराबाबत केलेले वक्तव्य चर्चेचा विषय

**महाईन्यूज** I नवी दिल्ली

**न्यूझीलंडमधील एका वरिष्ठ मंत्र्याने भारत आणि न्यूझीलंड यांच्यात नियोजित असलेल्या मुक्त व्यापार कराराबाबत केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. न्यूझीलंडमधील या मंत्र्याने दोन्ही देशांमधील या कराराला ‘बटर चिकन त्सुनामी’ असे म्हटल्याने संताप व्यक्त केला जात आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करारावर पुढच्या आठवड्यात दिल्लीत स्वाक्षरी केली जाणे अपेक्षित आहे.**

न्यूझीलंड सरकारने या कराराचे एक दुर्मिळ करार म्हणत कौतुक केले आहे. या करारामुळे न्यूझीलंडमधील व्यवसायांना भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशातील देशांतर्गत बाजारपेठेत प्रवेश मिळणार आहे. मात्र सत्तेत सहभागी असलेल्या उजव्या विचारसरणीच्या पॉप्युलिस्ट ‘एनझेड फर्स्ट’ पक्षाने करारास असलेला आपला पाठिंबा काढून घेतला आहे. या करारामुळे देशाच्या सीमा हजारो भारतीय नागरिकांसाठी खुल्या होतील, अशी भीती या पक्षाकडून व्यक्त केली जात आहे.

या सत्ताधारी पक्षांमधील फुटीमुळे, येत्या काही महिन्यांत जेव्हा या कराराशी संबंधित विधेयक संसदेत मांडले जाईल, तेव्हा ते मंजूर करून घेण्यासाठी सरकारला विरोधी पक्ष असलेल्या ‘लेबर पार्टी’च्या पाठिंब्याची गरज पडणार आहे.

सोमवारी एनझेड फर्स्ट पक्षाचे उपनेते आणि प्रादेशिक विकास मंत्री शेन जोन्स म्हणाले की, त्यांचा पक्ष हा करार कधीही स्वीकारणार नाही. “आमच्यावर किती टीका केली जाईल याची आम्हाला पर्वा नाही, पण न्यूझीलंडकडे येत असलेल्या बटर चिकन त्सुनामीसाठी मी कधीही सहमती देणार नाही,” असे जोन्स रिॲलिटी चेक रेडिओशी बोलताना म्हणाले.




दरम्यान अधिकाऱ्यांनी एएफपीशी बोलताना सांगितले की, भारत आणि न्यूझीलंडमधील प्रस्तावित करारामुळे २० हजार पेक्षा जास्त भारतीय स्थलांतरित न्यूझीलंडमध्ये प्रवेश करू शकतात. या पार्श्वभूमीवर न्यूझीलंडमध्ये राजकीय वातावरण अधिकच तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थलांतर, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांबाबत विविध मतप्रवाह पुढे येत आहेत. काही तज्ज्ञांच्या मते, या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीत मोठी वाढ होऊ शकते. तर विरोधकांचा दावा आहे की, यामुळे स्थानिक नागरिकांच्या नोकऱ्यांवर ताण येऊ शकतो.

### नेमका आक्षेप काय?

एनझेड फर्स्ट या पक्षाने या करारांतर्गत न्यूझीलंडवर घालण्यात येत असलेल्या एका अटीबाबतही चिंता व्यक्त केली आहे. या करारानुसार, न्यूझीलंडला पुढील १५ वर्षांच्या कालावधीत भारतात ३४ अब्ज न्यूझीलंड डॉलर्स (सुमारे २० अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतकी गुंतवणूक करावी लागणार आहे. लेबर पार्टीच्या अधिकाऱ्यांनी अद्याप या कराराला पाठिंबा द्यायचा की नाही याबाबत निर्णय घेतलेला नाही, या पक्षाने देखील गुंतवणुकीबाबत अशाच चिंता व्यक्त केल्या आहेत.

### न्यूझीलंडच्या मंत्र्यांच्या विधानानंतर टीका

न्यूझीलंडमधील भारतीय समुदायाच्या गटांनी मंत्र्यांनी केलेले हे विधान वर्णद्वेषी असल्याचे सांगत विधानाचा निषेध केला आहे. “हे प्रत्येकासाठीच प्रचंड चिंता वाढवणारे आहे”, असे मत ऑकलंड इंडियन असोसिएशनच्या अध्यक्षा शांती पटेल आरएनझेड या सार्वजनिक वृत्तवाहिनीशी बोलताना व्यक्त केले. तर विरोधी पक्षाच्या खासदार प्रियांका राधाकृष्णन यांनी हे विधान पूर्णपणे वर्णद्वेषी असल्याचे म्हटले आहे. “हे अस्वीकार्य आहे आणि त्यांनी केले तशी विधाने राजकारण्यांनी करायला नकोत,” असे त्या म्हणाल्या. तसेच न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन म्हणाले की, जोन्स यांचे विधान हे पूर्णपणे निरूपयोगी होते.

---

# ममता बॅनर्जींचा हस्तक्षेप लोकशाहीसाठी धोकादायक! सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

**महाईन्यूज** I पश्चिम बंगाल

**पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला अवघ्या काही तासांचा अवधी उरला असताना, राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. आय-पॅक रेड प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, "मुख्यमंत्र्यांचा तपास यंत्रणांच्या कामात हस्तक्षेप हा लोकशाहीला धोक्यात टाकणारा आहे," असे निरीक्षण नोंदवले आहे.**



८ जानेवारी २०२६ रोजी ED ने आय-पॅकचे प्रमुख प्रतीक जैन यांच्या कोलकाता येथील घरावर आणि कार्यालयावर छापा टाकला होता. प्रतीक जैन हे ममता बॅनर्जींचे राजकीय रणनीतीकार मानले जातात. छाप्यादरम्यान ममता बॅनर्जी स्वतः घटनास्थळी पोहोचल्या होत्या आणि त्यांनी तिथून काही महत्त्वाची कागदपत्रे, फाईल सोबत नेली, असा आरोप ED ने केला आहे. हे संपूर्ण प्रकरण २,७४२ कोटी रुपयांच्या कोळसा घोटाळ्यातील मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित आहे. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ED कडून या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. दरम्यान, तृणमूल काँग्रेसने या कारवाईला राजकीय सूडबुद्धीचा भाग असल्याचा आरोप करत केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचे ४ महत्त्वाचे ताशेरे

कोणत्याही राज्याचा मुख्यमंत्री तपासात अडथळा आणत असेल, तर ते लोकशाहीसाठी घातक आहे. संविधान बनवताना कोणीही असा विचार केला नसेल की, एक मुख्यमंत्री स्वतः तपास यंत्रणेच्या कार्यालयात किंवा छाप्याच्या ठिकाणी पोहोचेल. केवळ कायदेशीर सिद्धांतांवर काम चालणार नाही, आम्हाला जमिनीवरील वास्तवही पाहावे लागेल. परिस्थितीनुसार न्यायालयाला संविधानाची व्याख्या नव्याने करावी लागते.

### मतदानापूर्वी आय-पॅक विधाननगर येथील काम ठप्प

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानापूर्वीच (२३ एप्रिल) आय-पॅकचे विधाननगर येथील कार्यालय बंद करण्यात आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सुमारे १३०० कर्मचाऱ्यांना कामावर न येण्याचे पत्र पाठवण्यात आले आहे. आय-पॅकच्या सर्व्हेच्या आधारावरच तृणमूल काँग्रेसने ३३% विद्यमान आमदारांची तिकिटे कापली होती, त्यामुळे ऐन निवडणुकीत कार्यालय बंद होणे हा TMC साठी मोठा धक्का मानला जात आहे.

## 'राजा शिवाजी' चित्रपटाला टीकेचे ग्रहण



रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' या चित्रपटाची गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. अशातच नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर समोर आला. सोशल मीडियावर सध्या या ट्रेलरचीच चर्चा सुरू आहे. 'राजा शिवाजी' या चित्रपटात रितेश देशमुख मुख्य भूमिकेत म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत आहे. त्यानेच या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले आहे. मात्र, ट्रेलरमधील एका सीनवरून सध्या चर्चा सुरू झाली आहे. 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या ट्रेलरमधील एका सीनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज (रितेश देशमुख) अफजल खानाला वाघनखे दाखवताना दिसत आहेत. त्यावर काही नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. इतिहासाच्या संदर्भानुसार, अफजल खानाने हल्ला करेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांनी वाघनखे लपवून ठेवली होती, असा दावा नेटकरी करत आहेत.

## सावळ्या रंगामुळे डावललं



मनोरंजन क्षेत्रात काम करताना अनेक कलाकारांना सावळ्या रंगामुळे भेदभावाला सामोरं जावं लागतं. अनेकदा गोऱ्या वर्णाच्या कलाकारांना मालिका किंवा सिनेमांत मुख्य भूमिकांसाठी विचारणा होते. मात्र सावळ्या रंगामुळे अनेक कलाकारांमध्ये टॅलेंट असूनही त्यांना डावललं जातं. आपल्या करिअरमध्ये अनेक कलाकारांना वर्णभेदाचा सामना करावा लागतो.असाच वर्णभेदाचा सामना एका मराठी अभिनेत्रीला सहन करावा लागला होता. ही अभिनेत्री म्हणजे माधुरी पवार. नुकत्याच एका मुलाखतीत माधुरी म्हणाली," माझ्या आयुष्यात जन्मापासून बाहेरच्या काही लोकांनी आणि आता मी जिथे काम करते तिथेही काही लोक आहेत, त्यांना वाटतं की सावळा रंग आहे मग एका सावळ्या रंगाच्या मुलीला हिरोईन म्हणून कसं पदार्पण द्यावं. असं अनेकदा होतं. मी कधीकधी माझी प्रोफाईल काही लोकांना पाठवते, शिवाय कधीकधी मला असंही समजतं की, एखाद्या प्रोजेक्टमध्ये माझं नाव फायनल केलेलं असताना अचानक मला काढून टाकलं जातं.माझ्या रंगामुळे मला अनेकदा असं होतं.

## मला कोणावर अवलंबून राहायचं नाही!

टीव्हीपासून वेब सिरीजपर्यंत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री कृतिका कामरा सध्या पुन्हा चर्चेत आहे. नुकतीच तिची 'मटका किंग' ही सिरीज प्रदर्शित झाली असून तिच्या लग्नाचीही जोरदार चर्चा सुरू आहे. तिने अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत तिच्या करिअर आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधला. कृतिका कामराने (KRITIKA KAMRA) ३७ व्या वर्षी गौरव कपूरसोबत लग्न केलं. उशिरा लग्न केल्याबद्दल ती म्हणते की, "लहान वयात लग्न न केल्याचा मला खूप आनंद आहे. त्या वयात आपली विचारसरणी पूर्ण विकसित झालेली नसते." ती सांगते की, तिच्या कुटुंबाने कधीही लग्नासाठी दबाव टाकला नाही. तिच्या आई-वडिलांनी मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न करता दोघांनाही समान संधी दिली. प्रेम आणि नात्यांविषयी तिचा दृष्टिकोनही काळानुसार बदलला आहे. ती म्हणते की, टीनएजमध्ये आपण चित्रपट आणि गाण्यांमुळे खूप रोमँटिक विचार करतो. पण वयानुसार अनुभव वाढतात आणि आपण वास्तव समजू लागतो. २० ते ३० या वयात तिने स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखलं. "मी कोण आहे, मला काय हवं आहे आणि माझ्या आयुष्यातील प्राधान्य काय आहेत, हे मला समजलं," असं ती सांगते. गौरव कपूरसोबतच्या नात्याबद्दल बोलताना कृतिका म्हणते की, दोघेही स्वतंत्र आणि स्वतःच्या कष्टावर उभे राहिलेले आहेत. "मी भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. मला कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही," असं ती स्पष्टपणे सांगते.



# तामिळनाडू, महाराष्ट्र उपांत्य फेरीत

## युवा राष्ट्रीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत टॉपसिडेड


**महाईन्यूज ।**
**नवी दिल्ली**

**युटीटी आंतर राज्य कनिष्ठ आणि युवा राष्ट्रीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत टॉपसिडेड तामिळनाडू, प. बंगाल तसेच आसाम आणि महाराष्ट्र यांनी मुलांच्या विभागात उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला.**



उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात तामिळनाडूने पीएसपीबीएवर 3-2 अशा फरकाने विजय मिळवित उपांत्य फेरी गाठली तर महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने दिल्लीचा 3-2 असा पराभव करत शेवटच्या चार संघात स्थान मिळविले. प. बंगालने हरियाणाचा तर आसामने गुजरातचा 3-2 अशा समफरकाने पराभव केला.

महाराष्ट्र आणि दिल्ली यांच्यातील लढतीत कुशल चोपडाने अथर्व गुप्ताचा 11-4, 7-11, 11-5, 11-9 असा पराभव केला तर दुसऱ्या एका सामन्यात अर्जव गुप्ताने निल मुळेवर 12-10, 1-1, 9-11, 11-5 अशी मात केली. महाराष्ट्राच्या इशान खांडेकरने भास्कर सिंगचा 11-5, 11-6, 11-5 असा पराभव केला. तर कुशलला अर्जवकडून 8-11, 9-11, 6-11 अशी हार पत्करावी लागली. शेवटच्या सामन्यात महाराष्ट्राच्या निल मुळेने अथर्वचा 12-10, 5-11, 11-9, 12-10 असा पराभव करत आपल्या संघाला 3-2 अशा फरकाने विजय मिळवून दिला. या रोमांचक लढतीमुळे महाराष्ट्राचा संघ आत्मविश्वासाने उपांत्य फेरीत प्रवेश करताना दिसत आहे. आता उपांत्य फेरीतही अशीच कामगिरी कायम ठेवत विजेतेपदाच्या दिशेने वाटचाल करण्याचे संघाचे लक्ष्य असेल.



## राजस्थान रॉयल्सचा जायंट्सवर ४० धावांनी दमदार विजय

# पाकिस्तानचा अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नवाज 'ड्रग्ज टेस्ट'मध्ये पॉझिटिव्ह

**महाईन्यूज ।**
**नवी दिल्ली**

**पाकिस्तान क्रिकेट संघाचा स्टार फिरकीपटू आणि अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नवाज अमली पदार्थ चाचणीत (ड्रग्ज टेस्ट) दोषी आढळल्याने खळबळ माजली आहे. या गंभीर प्रकरणामुळे नवाज आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) चौकशीच्या फेऱ्यात अडकला असून, त्याच्या क्रिकेट कारकिर्दीवर टांगती तलवार निर्माण झाली आहे.**



फेब्रुवारी-मार्च दरम्यान श्रीलंका आणि भारत येथे खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषकात नवाजचा सहभाग होता. या स्पर्धेत पाकिस्तानचा प्रवास 'सुपर-८' फेरीपर्यंतच मर्यादित राहिला. नवाजची वैयक्तिक कामगिरीही अत्यंत सामान्य झाली होती; त्याने संपूर्ण स्पर्धेत केवळ १५ धावा केल्या आणि ७ बळी घेतले. सध्या तो पाकिस्तान सुपर लीगच्या (PSL) ११ व्या हंगामात 'मुलतान सुल्तान्स'कडून खेळत होता, तिथेही त्याला आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही.

### नेमके प्रकरण काय?

नुकत्याच पार पडलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ दरम्यान आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) खेळाडूंची उत्तेजक चाचणी घेण्यात आली होती. या चाचणीचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यामध्ये मोहम्मद नवाजचा नमुना 'पॉझिटिव्ह' आढळला आहे. आयसीसीने यासंदर्भातील अधिकृत माहिती पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कळवली आहे. पीसीबीने या प्रकरणाची तातडीने दखल घेत अंतर्गत चौकशी सुरू केली असून, २२ एप्रिल रोजी या प्रकरणाचा सविस्तर अहवाल आयसीसीला सादर केला जाणार आहे.

या प्रकरणावर अद्याप मोहम्मद नवाज किंवा सरे कौंटी क्रिकेट क्लबकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. पीसीबीच्या चौकशीत नवाज दोषी आढळल्यास त्याच्यावर दीर्घकालीन बंदीची कारवाई होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या प्रकरणामुळे मोहम्मद नवाजला मोठा आर्थिक आणि व्यावसायिक फटका बसला आहे. इंग्लंडमध्ये होणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'टी-२० ब्लास्ट' स्पर्धेसाठी नवाजने 'सरे' (SURREY) या संघासोबत करार केला होता. या स्पर्धेसाठी पीसीबीने त्याला दोन आठवड्यांपूर्वीच ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिले होते.

मात्र, आता चौकशी प्रलंबित असल्याने त्याला इंग्लंडला जाता येणार नाही. सरे या संघाकडून त्याच्या समावेशाची अधिकृत घोषणा याच आठवड्यात होणार होती, परंतु या ताज्या घडामोडींमुळे नवाजच्या सहभागावर पूर्णविराम लागला आहे एवढे नक्की.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper


epaper.mahaenews.com

। गुरुवार ।
दि. 23 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## चौकशी अहवाल आयुक्तांकडे; प्रवीण जैन अडचणीत, फौजदारी कारवाई की अभय याकडे लक्ष

# पीसीएमसीतील ५२ कोटींचा बोगस उपसूचना घोटाळा उघड




महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी बोगस उपसूचनेद्वारे 52 कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे. त्यामध्ये नगरसेवकांसह विभागप्रमुख, अभियंते तसेच, ठेकेदार सहभागी आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती नेमली होती.**

त्या समितीने सात दिवसांनंतर अखेर, मंगळवार (दि. 21) चौकशी अहवाल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना सादर केला आहे. समितीने जैन यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस केली की, त्यांना अभय दिले आहे, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

प्रवीण जैन यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्थापत्य, बीआरटीएस व इतर अशी 70 हून अधिक कामांची बिले वेगवेगळ्या 20 ठेकेदारांना 30 मार्चच्या रात्रीत परस्पर अदा केली आहेत. ही बाब महापालिका अधिनियम 1949 मधील अंदाजपत्रकीय नियंत्रण, वित्तीय शिस्त व अधिकृत मंजुरीसंदर्भातील तरतुदींच्या उल्लंघनास कारणीभूत आहे. या प्रकरणाची स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी पुराव्यासह तक्रार केली. त्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी डॉ. सूर्यवंशी यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती 9 एप्रिलला नेमली आहे.




या समितीमध्ये अतिरिक्त आयुक्त (क्रमांक एक) कुलदीप जंगम हे समितीचे अध्यक्ष आहेत. तसेच, अतिरिक्त आयुक्त (क्रमांक दोन) तृप्ती सांडभोर, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे हे समितीचे सदस्य आहेत. चौकशीत दबाव येऊ नये म्हणून आयुक्तांनी दुसऱ्याच दिवशी 10 एप्रिलला प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. समितीने लेखा विभागाकडून आवश्यक कागदपत्रे ताब्यात घेऊन त्यांनी चौकशी केली आहे. चौकशीत प्रवीण जैन यांनी नियमबाह्यपणे काम केल्याचे स्पष्ट झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. आयुक्त जैन यांच्यावर कारवाई करतात. की, त्यांच्या कारनाम्यावर पांघरून घालून त्यांना अभय देतात, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

दरम्यान, महापालिका तिजोरीच्या चाव्या असलेल्या लेखा विभागाकडून आर्थिक घोटाळा झाल्या असल्याने, चौकशी अहवालातून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. त्यामुळे पुढे असे प्रकार घडण्यास चाप बसले, अशी महापालिका वर्तुळात चर्चा आहे.

### आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष

चौकशी समितीने अहवाल आज आयुक्तांना सादर केला आहे. तो केवळ 52 कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याचा अहवाल असल्याचे सांगितले जात आहे. मागील तीन वर्षांतील घोटाळ्याचा अहवाल तयार करण्यात आणखी वेळ लागणार आहे. 52 कोटींच्या घोटाळ्यात आयुक्त दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. आयुक्तांनी कठोर भूमिका घेतल्यास लेखा विभागासह इतर विभागांना आर्थिक शिस्त लागू शकते. नियमबाह्यपणे काम करण्यास आळा बसेल, असे सांगितले जात आहे.

### घोटाळ्याचा आढावा

महापालिकेतील ५२ कोटींच्या बोगस उपसूचना प्रकरणात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी नियमबाह्य पद्धतीने ७० हून अधिक कामांची बिले २० ठेकेदारांना अदा केल्याचे उघड झाले आहे. चौकशी समितीचा अहवाल आयुक्तांकडे सादर झाला असून, दोषींवर फौजदारी कारवाई होणार की अभय दिले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कारवाई की पांघरूण?

५२ कोटींच्या बोगस उपसूचना प्रकरणात चौकशी अहवाल आयुक्तांकडे सादर झाल्यानंतर महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात नियमबाह्य व्यवहार, आर्थिक शिस्तीचा भंग आणि ठेकेदारांना मोठ्या प्रमाणावर देयके अदा केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. दुसरीकडे, या प्रकरणात अनेक स्तरांवरील संबंध समोर येण्याची शक्यता असल्याने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होईल का, अशीही चर्चा रंगली आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये गुन्हेगारीचा सुळसुळाट!

## मोमो सेंटर चालकाकडे चार लाखांच्या खंडणीची मागणी; दुकानाची तोडफोड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर परिसरात दुकानात शिरून चार लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करत दुकानदाराला धमकावले. ही घटना सोमवारी (२० एप्रिल) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कुणाल आयकॉन रस्त्यावर घडली.**



या प्रकरणात २० वर्षीय तरुणाने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सोपान गजानन बुलाखे (२१, केशव नगर, पिंपळे सौदागर), ओंकार उद्धव बाबर (२०, काटे वस्ती, पिंपळे सौदागर) आणि विवेक विनोद अंबोरे (१८, पिंपळे सौदागर गावठाण; मूळ-केळवदवाडी, चिखली, बुलढाणा) या तिघांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी दुचाकीवरून येत फिर्यादीच्या दुकानात प्रवेश केला. चार लाख रुपयांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. एकाने कोयता उगारून तर दुसऱ्याने स्टूलने दुकानातील साहित्याची, लॅपटॉपची आणि ग्राहकांच्या मोटारींच्या काचेची तोडफोड केली. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

### मॅगझीन चौकात पिस्तूल व जिवंत काडतुसासह तरुणाला अटक

बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक केली. ही कारवाई मंगळवारी (२१ एप्रिल) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मॅगझीन चौक ते वाळके मळा जाणाऱ्या रोडवर दिघी येथे करण्यात आली.

उमेश उर्फ अजय ब्रम्हणे (२०, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुधीर डोळस यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळके मळा रोडवर एक तरुण संशयितपणे थांबला असून त्याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती दिघी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून उमेश याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ५१ हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. दिघी पोलीस तपास करत आहेत.

काळेवाडी परिसरात पोलिसांनी गस्त घालत असताना एका तरुणाकडून विनापरवाना पिस्तूल जप्त केले आहे. ही कारवाई मंगळवारी (२१ एप्रिल) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास केली.

रोहित दिनेश शिंदे (१८, रमाबाई नगर, भाटनगर, पिंपरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलीस कॉन्स्टेबल स्वप्नील खेतले यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीच्या कब्जात २७ हजार रुपये किमतीचे एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस मिळून आले.

### वाकड परिसरात सुगंधी पान मसाला विकणाऱ्या तरुणाला अटक

शासकीय बंदी असतानाही चोरून प्रतिबंधित पान मसाल्याची विक्री करणाऱ्या एका व्यावसायिकावर अन्न सुरक्षा विभागाने कारवाई केली आहे. ही कारवाई मंगळवारी (२१ एप्रिल) दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास वाकड येथील काळाखडकमध्ये केली.

याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी शितल घाटोळ यांनी फिर्याद दिली आहे. रणजित राजू चौरसिया (२६, वाकड, पुणे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

अन्न सुरक्षा विभागाचे पथक गस्त घालत असताना काळाखडक येथे एका टपरी मध्ये प्रतिबंधित असलेला केसरयुक्त विमल पान मसाला आरोपी विकताना मिळून आला. त्याच्याकडून एकूण ५ हजार ९५५ रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

### आधार कार्ड मागण्यासाठी गेलेल्या वृद्ध महिलेला मारहाण

स्वतःची कागदपत्रे परत मागण्यासाठी गेलेल्या ६५ वर्षीय महिलेला आणि त्यांच्या मुलाला पुतण्याने शिवीगाळ करत सिमेंटच्या गट्टूने मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना रहाटणी परिसरात घडली. या प्रकरणात ५२ वर्षीय व्यक्तीने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची आई या पुतण्याकडे स्वतःचे आधार कार्ड आणि पॅन कार्ड मागण्यासाठी गेल्या होत्या. मात्र कागदपत्रे देण्यास नकार देऊन आरोपीने त्यांना ढकलून दिले. याबाबत विचारणा करण्यासाठी फिर्यादी आणि त्यांची पत्नी गेली असता, आरोपीने त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सिमेंटचा गट्टू फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

# जिद्द, चिकाटीच्या जोरावर ‘तांड्या’चा मुलगा झाला न्यायाधीश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वडील ऊसतोड कामगार आणि आई रस्त्यावरील खोदकाम करणारी मजूर... घरात शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नाही आणि राहण्यासाठी तांड्यावरील झोपडी. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून गरिबीचे चटके सोसत परभणी जिल्ह्यातील एका तरुणाने यशाची उत्तुंग भरारी घेतली आहे.**



आळंदीत वारकरी शिक्षण घेणाऱ्या ज्ञानेश्वर रामराव चव्हाण यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात १२वा क्रमांक पटकावून कनिष्ठ स्तर न्यायाधीश पदाला गवसणी घातली आहे. त्यांच्या या यशामुळे ऊसतोड कामगाराचा मुलगा आता न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसणार असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील गणेशनगर तांडा येथील रहिवासी असलेल्या ज्ञानेश्वर चव्हाण यांचा प्रवास सोपा नव्हता. गावात प्राथमिक शिक्षणाची सोय नसल्याने आणि घरची आर्थिक ओढाताण असल्याने त्यांच्या पुढच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर होता. मात्र, शिक्षणाची ओढ पाहून त्यांना आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेत पाठवण्यात आले. येथेच त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. आळंदीतील ज्ञानेश्वर विद्यालयातून त्यांनी बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर जिद्दीच्या जोरावर पुण्यातून वाणिज्य शाखेची पदवी आणि विधी शाखेचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाचा खर्च पेलण्यासाठी त्यांनी खासगी ठिकाणी काम करून पैसे जमवले आणि त्यातून पुस्तके खरेदी केली. आईचा आधार आणि स्वतःची चिकाटी कमी पडू न देता त्यांनी दुसऱ्या प्रयत्नात हे देदीप्यमान यश संपादन केले.

### कुटुंबातील पहिलीच 'दहावी पास' व्यक्ती आता न्यायाधीश

चव्हाण यांच्या कुटुंबात शिक्षणाशी कोणाचाही दुरान्वये संबंध नव्हता. कुटुंबात दहावीची पायरी चढणारे ज्ञानेश्वर हे पहिलेच सदस्य होते. आज त्याच कुटुंबातील मुलगा राज्याच्या गुणवत्ता यादीत बारावा येत न्यायाधीश झाला आहे. ‘आई-वडिलांचे कष्ट, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रांचे पाठबळ यांमुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो,’ अशी भावना चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

# पुणे-मुंबई एक्सप्रेसवेवर तात्पुरती वाहतूक बंद!

## डोंगरगाव-कुसगाव पुलाच्या कामासाठी वाहतूक पूर्णपणे बंद; प्रशासनाचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे-मुंबई दरम्यानचा सर्वाधिक महत्त्वाचा द्रुतगती मार्ग असलेल्या यशवंतराव चव्हाण एक्स्प्रेसवेवर तात्पुरती वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला आहे. डोंगरगाव-कुसगाव परिसरातील कि.मी. क्र. 58/500 येथे उभारण्यात आलेल्या पुलाच्या अंतिम टप्प्यातील कामांसाठी ही बंदी लागू करण्यात येणार आहे. पुलाचे शटरिंग काढणे तसेच रंगकाम करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आल्याने काही कालावधीसाठी वाहतूक पूर्णपणे थांबवावी लागणार आहे.**



### प्रवाशांना प्रशासनाचे आवाहन

वाहतूक बंदीच्या कालावधीत प्रवाशांनी शक्यतो प्रवास टाळावा किंवा पर्यायी वेळ निवडावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, प्रवास करण्यापूर्वी वाहतुकीची सद्यस्थिती तपासूनच मार्ग निवडावा. दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही सांगण्यात आले आहे. प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन करताना अतिरिक्त वेळ गृहित धरावा, कारण पर्यायी मार्गांवर वाहतूक वाढल्याने प्रवासाचा कालावधी वाढू शकतो. तसेच, आवश्यक त्या सुविधा जसे की इंधन, पाणी इत्यादींची पूर्वतयारी करूनच प्रवास करणे हितावह ठरेल.

या निर्णयामुळे एक्स्प्रेसवेवरून दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना काही प्रमाणात गैरसोय होण्याची शक्यता आहे. मात्र, सुरक्षेच्या दृष्टीने ही बंदी आवश्यक असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. कामाच्या ठिकाणी मोठ्या यंत्रसामग्रीचा वापर होणार असल्याने तसेच रस्त्यावर अडथळे निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबईकडे जाणारी वाहतूक दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत सर्व वाहने किवळे - देहूरोड - तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून कुसगाव टोल प्लाझा येथे वळविण्यात येतील.

तसेच, पुण्याकडे येणारी वाहतूक दिनांक 24 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत पूर्णपणे बंद राहणार आहे. या वेळी कुसगाव टोल प्लाझा मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून देहू रोड - किवळे मार्गे सर्व वाहने पुण्याकडे वळविण्यात येतील.

तसेच, पुण्याकडे येणारी वाहतूक दिनांक 24 एप्रिल 2026 रोजी दुपारी 12 ते 3 या वेळेत पूर्णपणे बंद राहणार आहे. या वेळी कुसगाव टोल प्लाझा मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून देहू रोड - किवळे मार्गे सर्व वाहने पुण्याकडे वळविण्यात येतील.

एक्स्प्रेसवेवरील वाहतूक बंद झाल्यामुळे सर्व वाहने राष्ट्रीय महामार्ग 48 वर वळवली जाणार आहेत. त्यामुळे किवळे, देहूरोड, तळेगाव, कुसगाव या परिसरात वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत स्थानिक वाहतूक, औद्योगिक वाहने आणि प्रवासी वाहतूक एकाच मार्गावर येणार असल्याने काही प्रमाणात वाहतूक कोंडी होऊ शकते. वाहतूक पोलिसांनी या पार्श्वभूमीवर आवश्यक ती यंत्रणा सज्ज ठेवली असून, महत्त्वाच्या चौकांवर अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्यात येणार आहे. तसेच, वाहतुकीचे नियोजन सुरळीत ठेवण्यासाठी विविध ठिकाणी दिशा दर्शक फलकही लावण्यात येणार आहेत. या कालावधीत द्रुतगती मार्गावर कोणतीही अडचण उद्भवल्यास वाहनचालकांनी नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक 9822498224 किंवा महामार्ग पोलीस विभागाचा 9833498334 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे. हे दोन्ही क्रमांक सतत कार्यरत राहणार असून, तातडीच्या मदतीसाठी उपलब्ध असतील. प्रवासापूर्वी मार्गाची माहिती तपासून घ्यावी. पर्यायी मार्गांचा नकाशा उपलब्ध ठेवावा. वाहतुकीची अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर करावा. वाहतूक नियमांचे पालन करावे आणि घाईगडबड टाळावी. लांब पल्ल्याच्या प्रवाससाठी अतिरिक्त वेळ राखून ठेवावा.

पुणे-मुंबई एक्स्प्रेसवेवरील ही तात्पुरती वाहतूक बंदी सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असली, तरी यामुळे काही काळासाठी प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. मात्र, प्रशासनाने पर्यायी मार्गांची योग्य व्यवस्था केल्याने आणि प्रवाशांनी योग्य नियोजन केल्यास ही परिस्थिती सहज हाताळता येईल.

# भाजपा युवा मोर्चा वतीने मोरवाडी येथे निदर्शने

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाला 'नारी-शक्ती वंदन अधिनियम' (महिला आरक्षण विधेयक) विरोध करणाऱ्या काँग्रेस व इंडी आघाडीतील पक्षांविरोधात देशभरात महिलांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळलेली दिसून येते.**



याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा वतीने मोरवाडी येथे जन आक्रोश आंदोलन आयोजित करण्यात आले. महिलांच्या हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याच्या उद्देशाने मोरवाडी येथे हे करण्यात आंदोलन आले .पिंपरी-चिंचवड शहरातूनही मोठ्या संख्येने युवती युवक युवा मोर्चा पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले.

महिला आरक्षणास विरोध करून विरोधकांनी आपली महिलांविरोधी मानसिकता उघड केली असून,त्याचा जाहीर निषेध यावेळी करण्यात आला. देशातील नारीशक्तीचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे. महिला आरक्षणाला अडथळे निर्माण करणारे पक्ष केवळ एका विधेयकाचा नव्हे, तर संपूर्ण स्त्रीशक्तीचा अपमान करत आहेत. हा अपमान भाजप कदापिही सहन करणार नाही. अशी तीव्र भावना यावेळी व्यक्त केली.

या आंदोलनात दिनेश यादव, सुजाता पलांडे, अजित कुलथे, दिनेश काटे, प्रसाद कस्पटे, राहुल खाडे, साची दोषी, रवी जांभुळकर, मयूर काळभोर, देवयानी भिंगरकर, दयानंद बंडगर, प्रदीप नाईक, प्रतीक रामगुडे, ऋषिकेश भालेकर, आदम मुलानी, योगिता जाधव

अर्चना शेंडगे, स्वाती वाघमारे, सुनीता शिंग, शिल्पा शिंग, तनया चरखे ,कोमल गाडगीरे ,प्रतीक्षा देशमुख,भक्ती जकताबा यांच्यासह महिला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा सीबीएसई इयत्ता दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. यामध्ये निरंजन अनुसे याला ९८.४ टक्के गुण मिळाले असून त्याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक आरना झांजे आणि खुशी कटारिया ९८ टक्के, तृतीय क्रमांक श्रीजीत राठोड आणि वेदांत मडोली ९७.८ टक्के, चौथा क्रमांक अंकूर हरल आणि आर्या देवशटवार ९७.६ टक्के तर पाचवा क्रमांक सिद्धी जाधव आणि सुधनवा कुलकर्णी यांनी ९७.४ टक्के गुण मिळवले.

एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या एकूण २७९ विद्यार्थ्यांपैकी १०८ विद्यार्थ्यांना ९१ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. तसेच १६५ विद्यार्थ्यांनी इंग्रजी विषया मध्ये ९१ पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महापालिकेत 1100 कोटींच्या उपसूचनांवरून वाद

## विषयपत्रिकेत उल्लेख नसतानाही मंजुरी जाहीर; पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती तसेच, महापालिका सर्वसाधारण सभेकडून सन 2026-27 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पावर तब्बल 1 हजार 100 कोटी रुपयांचा उपसूचना देण्यात आला आहे. मात्र, सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर उपसूचना तसेच, अर्थसंकल्पासंदर्भातील एकही विषय नसताना, महापौर रवी लांडगे यांनी त्या सर्व उपसूचना मंजूर करण्यात आल्याचे घोषित केले आहे.**



त्यामुळे महापौरांना सभा कामकाज समजत नाही की, आर्थिक घोटाळा दडवण्याचा प्रयत्न त्या माध्यमातून केला जात आहे, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

सर्वसाधारण सभेसमोर 15 विषय होते. मात्र, ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहून सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात आली. तसेच, संसदेत नारी शक्ती वंदन विधेयक मंजूर न झाल्याने भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) व शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) नगरसेवकांनी काँग्रेस व मित्र पक्षांचा निषेध करीत आपली मते व्यक्ती केली.

त्यामुळे सभागृहासमोर एकही विषय आला नाही. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सभा तहकूब करण्याची सूचना मांडली त्याला नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सभा तहकूब करताना महापौर लांडगे यांनी मागील सभेचे इतिवृत्त मंजूर झाल्याचे जाहीर केले. तसेच, सन 2026-27 च्या अर्थसंकल्पास दिलेल्या सर्व उपसूचना ग्राह्य व अग्राह्य धरत एकत्रित सुधारित अर्थसंकल्पास मंजूर करण्यात आले आहे, असे त्यांनी घोषित केले. त्यानंतर सभा 5 मे रोजीपर्यत दुपारी एकपर्यंत तहकूब केली. मात्र, विषयपत्रिकेवर अर्थसंकल्पासंदर्भातील कोणताही विषय नव्हता. तसेच, एकाही नगरसेवकाने त्या संदर्भात मत प्रदर्शन केले नाही. असे असताना महापौरांनी तब्बल 1 हजार 100 कोटी रुपयांच्या उपसूचना मंजूर केल्याचे जाहीर केले. त्यावरून उपसूचनांद्वारे झालेल्या घोटाळा दडवण्याचा प्रयत्न करण्यात आला का, अशी शंका उपस्थित केली जात आहे.

महापालिकेच्या सोमवार (दि.20)च्या सर्वसाधारण सभेच्या पटलवार सन 2026-27 अर्थसंकल्पाचा तसेच, अर्थसंकल्पावरील विषय सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्याचा विषय नव्हता, असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत 6 फेब्रुवारीच्या पहिल्या विशेष सभेचे इतिवृत्त मंजुरीचा विषय होता. त्या सभेत महापौर व उपमहापौर यांची निवड करत ती सभा तहकूब करण्यात आली होती.

### सर्वसाधारण सभेतील विषय

सर्वसाधारण सभेसमोर खालील विषय आहेत. दहा स्वीकृत नगरसेवकांची निवड करणे. प्रारुप सुधारित विकास योजनेसंदर्भात (डीपी प्लान) प्राप्त हरकतीवर सुनावणी घेण्यासाठी समितीमध्ये स्थायी समितीच्या 4 सदस्यांची निवड करणे. प्राधिकरण, निगडी येथील यशवंतराव चव्हाण स्मारक समितीला एक कोटी रुपयाची देणगी देणे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक तयारीसाठी झालेल्या वाढीव खर्चासाठी तरतूद करणे. शहरातील मालमत्तांचे तीनऐवजी अ आणि ब असे दोन विभाग करून मालमत्ताकराची वसुली करणे. शहरात पाणीपुरवठा परिचलन कामास तीन महिने मुदतवाढ देणे.

# न्यू पुणे पब्लिक स्कूलचा मनमानी कारभार; संतप्त पालकांचा उद्रेक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**निगडी प्राधिकरण परिसरातील न्यू पुणे पब्लिक स्कूल प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता तब्बल १५ टक्के फी वाढ केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या बेकायदेशीर व नियमबाह्य निर्णयाविरोधात शेकडो संतप्त पालकांनी शाळेवर मोर्चा काढत शाळा प्रशासन तसेच संचालक प्रदीप खंदारे यांच्याविरोधात तीव्र आंदोलन केले.**




पालकांच्या म्हणण्यानुसार, विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात गरज नसलेल्या विविध कोर्सेस सक्तीने दाखवून, त्याच्या नावाखाली फीमध्ये १५ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. ही फीवाढ करताना ना पालकांची संमती घेण्यात आली, ना कोणतीही लेखी पूर्वसूचना देण्यात आली. त्यामुळे शाळा प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही जाचक आणि बेकायदेशीर फीवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

फीवाढीपुरतेच नव्हे तर शैक्षणिक साहित्य, वह्या, पुस्तके, गणवेश तसेच इतर आवश्यक वस्तूही शाळा प्रशासनाकडूनच खरेदी करण्याची सक्ती पालकांवर केली जात असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, या सर्व वस्तू बाजारभावापेक्षा अधिक किमतीत विकल्या जात असल्याने पालकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. यामुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय पालकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.



### या विषयावर महापालिका सभागृहात होणार संयुक्त बैठक

या सर्व प्रकाराविरोधात संतप्त पालकांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची गंभीर दखल घेत, शिक्षण विभागाने एका आठवड्यात शाळा प्रशासन, पालक प्रतिनिधी आणि शिक्षण अधिकारी यांची संयुक्त बैठक महानगरपालिका सभागृहात बोलावण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. या बैठकीत न्यू पुणे पब्लिक स्कूलमधील नियमबाह्य फीवाढ, शाळेतील असुविधा, महागडी व सक्तीची शैक्षणिक साहित्य खरेदी तसेच प्रशासनाच्या मनमानी कारभारावर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन शिक्षण विभागाकडून देण्यात आले आहे.

### अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होणार

दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही पालकांनी दिला असून, महानगरपालिका प्रशासनाने यामध्ये गांभीर्याने लक्ष द्यावे व शाळा प्रशासनाला कडक नियम लावून त्याची अंमलबजावणी करावी. हा प्रश्न केवळ न्यू पुणे पब्लिक स्कुलपुरता मर्यादित न राहता संपूर्ण शहरातील खासगी शाळांच्या मनमानी कारभाराविरोधातील लढा ठरेल, अशी भूमिका पालकांनी यावेळी मांडली.